11 JUL 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘फिनशिंग स्कूल लॅब’चे उद्‌घाटन

## गोशिमा सबक्लस्टरतर्फे उभारणी : कुलगुरूंसह मान्यवर उपस्थित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कणेरी :** गोकुळ शिरगाव औद्योगिक वसाहत येथे कोल्हापूर फौंड्री अँड इंजि. क्लस्टरच्या अंतर्गत गोशिमा सबक्लस्टरतर्फे ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ची उभारणी करण्यात आली आहे. त्यापैकी ‘फिनशिंग स्कूल लॅब’चे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले.



गोकुळ शिरगाव औद्योगिक वसाहत येथे गोशिमा सब क्लस्टरच्या सेंटर ऑफ एक्सलन्स मधील ‘फिनशिंग स्कूल लॅब’ कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले.

जिल्ह्यात प्रथमच प्रशिक्षण, कौशल्य विकास व अप-स्किलींग क्षेत्रात अशा प्रकारची सुविधा विकसित केली आहे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, इंजिनिअरिंग कॉलेजमधील अभियांत्रिकी शाखेच्या अंतिम वर्षे विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे.

उद्योजक सचिन शिरगावकर यांनी परिपूर्ण इंजिनिअर तयार करण्यासाठी ख्रिस्तीयांनी शार्पलाइन या जर्मन तंत्रज्ञानावर आधारित कंपनीच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे सांगितले.

कोल्हापूर फौंड्री अँड इंजि.क्लस्टरचे कार्यकारी संचालक श्रीकांत दुधाणे, गोशिमाचे अध्यक्ष मोहन पंडितराव, उपाध्यक्ष दीपक चोरगे, नितीनचंद्र दळवाई, स्वरूप कदम, संचालक अजित आजरी, सुरजितसिंग पवार, लक्ष्मीदास पटेल, राजीव परीख, जे. आर. मोटवाणी, सुनील शेळके, रणजित पाटील, प्रसाद गुळवणी, अरुण आराध्ये, राजवर्धन जगदाळे, चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष संजय शेटे, उपाध्यक्ष शिवाजीराव पवार, मॅकचे अध्यक्ष संजय पेंडसे, स्मॅकचे अध्यक्ष दीपक पाटील, उपाध्यक्ष एम.वाय.पाटील, राजू पाटील, सुरेंद्र जैन, कोल्हापूर इंजिनीअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष हर्षद दलाल, उपाध्यक्ष दिनेश बुधले, सी.आय.आय. अध्यक्ष रवी डोली, जिल्हा कौशल विकासचे सहायक आयुक्त संजय माळी, सोहन शिरगावकर, चंद्रशेखर डोली, प्रसाद मंत्री, प्र. कुलगुरू प्रमोद पाटील, सागर डेळेकर, डॉ.ए.एम.गुरव, प्राचार्या डॉ. सुनीता दळवाई, मोहन अय्यर आदी उपस्थित होते. योगेश कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. रणजित मोरे यांनी आभार मानले.

पुढारी

# पदवी प्रथम वर्ष प्रवेश अंतिम टप्प्यात

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कार्यक्षेत्रातील महाविद्यालयातील पदवी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. १ ऑगस्टपासून प्रथम व द्वितीय वर्षाचे वर्ग सुरू करण्याची तयारी महाविद्यालयांनी सुरू केली आहे.

गेल्या वर्षी पदवी महाविद्यालयांमध्ये बहुतांश प्रवेश ऑनलाईन पद्धतीने देण्यात आले. यंदा कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर पदवी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात केली. अभियांत्रिकीसह इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश प्रक्रियेची सीईटी अद्याप झालेली नाही. बारावीनंतर विद्यार्थ्यांनी कोणत्या न कोणत्या महाविद्यालयांत तात्पुरते प्रवेश घेतले आहेत. सीबीएससी बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यावर संबंधित विद्यार्थी रिक्त जागांवर प्रवेश घेऊ शकतात. तसेच पदवी प्रथम वर्षाच्या मागील परीक्षेचे निकाल २५ जुलैपर्यंत जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यानंतर द्वितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया होऊन महाविद्यालयांचे वर्ग सुरू होतील, असे महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सांगितले.

**■ १ ऑगस्टपासून महाविद्यालये सुरू**

तरुण भारत

# पदवी प्रथम वर्ष प्रवेश अंतिम टप्प्यात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कार्यक्षेत्रातील महाविद्यालयातील पदवी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. १ ऑगस्टपासून प्रथम आणि व्दितीय वर्षाचे वर्ग सुरू करण्याची तयारी महाविद्यालयांनी सुरू केली आहे. गेल्या वर्षी पदवी महाविद्यालयांमध्ये बहुतांश प्रवेश ऑनलाईन पद्धतीने देण्यात आले. यंदा कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर महाविद्यालयांनी बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर पदवी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेला सुरूवात केली. शहरातील महाविद्यालयांत गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत. अभियांत्रिकीसह इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश प्रक्रियेची सीईटी अद्याप झालेली नाही. बारावीनंतर विद्यार्थ्यांनी कोणत्या न कोणत्या महाविद्यालयात तात्पुरते प्रवेश घेतले आहेत. सीबीएससी बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यावर संबंधित विदयार्थी रिक्त जागांवर प्रवेश घेऊ शकतात. तसेच पदवी प्रथम वर्षाच्या मागील परीक्षेचे निकाल २५ जुलैपर्यंत जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यानंतर व्दितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया होऊन महाविद्यालयांचे वर्ग सुरू होतील, असे महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सांगितले.